१. प्रथम - वेडिंग ॲनिव्हर्सरी - अभिनय, कल्याण
२. द्वितीय - च-हाट - प्रायोगिक, मुंबई
३. तृतीय - एकूट समूह - रंगसंगती कलामंच, ठाणे.

अंतीम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. प्रदिप कबरे, श्री. कुमार सोहनी, श्रीमती शीतल करदेकर, श्री. प्रदीप प्रधान आणि श्री.शफी नायकवडी यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिका ९४ व्या नाट्य संमेलनात सादर करण्यात आल्या.

## शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे कै. प्रा. डॉ. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या स्मरणार्थ एकांकिका स्पर्धा आयोजित केली होती. त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी एकूण तेहतीस शाखांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी सांगली, पुणे, बीड आणि माटुंगा केंद्रावर दिनांक १७, १८,२१, आणि २३ ऑक्टोबर २०१३ रोजी संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून सांगली केंद्रावर श्री. मोहन जोशी आणि श्री. दिलीप देवरणकर, पुणे केंद्रावर श्री. मोहन जोशी आणि श्रीमती वीणा लोकूर, बीड केंद्रावर श्री. शफी नायकवडी आणि श्री. रमेश कदम आणि माटुंगा केंद्रावर श्री. दीपक करंजीकर आणि डॉ. गिरीष ओक यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी दिनांक ८ नोव्हेंबर २०१३ रोजी यशवंत नाट्यमंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीमध्ये एकूण नऊ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील शाखांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.
१. प्रथम - चिंतामणी नगर - साठा उत्तराची कहाणी
२. द्वितीय - रंगमंच कामगार संघ - विड्रॉल सिम्टम्स्
३. तृतीय - पुणे - ओळखलंत का सर.

अंतिम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. अनंत कुलकर्णी, श्री. अविनाश देशमुख, श्रीमती सुकन्या कुलकर्णी - मोने, आणि विजय केंकरे यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिकाही ९४ व्या नाट्य संमेलनात सादर करण्यात आल्या. दोन्ही एकांकिका स्पर्धांचे आयोजक म्हणून नाट्यपरिषदेतर्फे श्री. शिवाजी शिंदे, श्रीमती गीता सोमण आणि श्री. दिगंबर आगाशे यांनी काम पाहिले.

## गरजू रंगकर्मींसाठी आर्थिक मदत

१. नाट्यपरिषदेने सुरू केलेली गरजू रंगकर्मींना मासिक अनुदान योजना आणि मानधन योजना व्यवस्थित कार्यान्वीत असून त्या अंतर्गत ३९ रंगकर्मींना अनुदान देण्यात येते.

२. प्रतिवर्षीप्रमाणे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सांस्कृतिक सचिव मा. श्री. अमेय खोपकर यांनी निवडलेले ज्येष्ठ रंगकर्मी श्री. सिताराम कुंभार, श्री. यशवंत मडकईकर, श्री. बापू लिमये आणि श्रीमती ए. एस. कल्याणी यांना, प्रत्येकी रू. ५१,०००/- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष, मा. श्री. राज ठाकरेसाहेब यांच्या हस्ते आर्थिक मदत करण्यात आली. यासाठी नाट्य परिषदेने प्रयत्न केले. नाट्य परिषदेने ५७१ रंगमंच कामगारांचा स्टार हेल्थ ॲण्ड एलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांच्याकडे ग्रुप मेडिक्लेम वीमा उतरविला असून त्याचा संपूर्ण प्रिमीयम नाट्य परिषदेने भरला आहे.